**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-२२६२/२०२२**

**अपिलार्थी, श्री.संजय भास्कर येरुणकर,**
**फ्लॅट नं.१, माहिम जार्डीन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.,**
**(गार्डन अपार्टमेंट), प्लॉट नं. ४६८, गॅब्रिएल रोड, माहिम (प),**
**मुंबई ४०० ०१६.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, रोहा, रोहा पोलीस स्टेश जवळ,
चनेरा रोड, ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, रोहा, रोहा पोलीस स्टेश जवळ,
चनेरा रोड, ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २५.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.२.२०२२ | ---- | १५.६.२०२२ | २७.७.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.१.८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २५.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. त्यांचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. राजेश थोरे, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय रोहा हे समक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(चिंचवली तुर्फे दिवाळी, ता.रोहा, जि.रायगड येथील जमिनीबाबत एकत्रीकरण योजनेपूर्वीचे खाली दर्शवलेल्या सर्व्हे नं.चे सन १९८० सालचे ७/१२ उताऱ्याचे सत्य प्रती मिळणेबाबत.)"*

*"(सर्व्हे नं. ५ हिस्सा नं. २, (२) सर्व्हे नं. ५ हिस्सा नं. ५, (३) सर्व्हे नं. ८ हिस्सा नं १२ (अ) (४) सर्व्हे नं. ८, हिस्सा नं. १२ (ब) (५) सर्व्हे नं. ८, हिस्सा नं. १२ (क), (६) सर्व्हे नं.८ हिस्सा नं. १३ (अ) (७) सर्व्हे नं. ८ हिस्सा नं. १३ (ब) (८) सर्व्हे नं. ८ हिस्सा नं. १३ (क).)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.७.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे." असा निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली होती. त्यापैकी त्यांना २ सर्व्हे नंबरचे ७/१२ (सर्व्हे नं. ५ हिस्सा नं. २, (२) सर्व्हे नं. ५ हिस्सा नं. ५) प्राप्त झाले आहेत. उर्वरित ६ सर्व्हे नंबरचे ७/१२ उतारे आपणास प्राप्त झाले नाहीत.

या संदर्भात युक्तिवाद करताना जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी असे निवेदन केले की, संबंधित तलाठी, तलाठी सजा तिसे यांनी असे लेखी दिले आहे की, संबंधित ७/१२ उतारे त्यांच्या अभिलेखात उपलब्ध नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांचे हे विधान अतिशय आश्चर्यकारक आहे. एखादया मिळकतीचा अभिलेख हा तलाठी दप्तरमधून गहाळ झाला आहे. याबाबीचे गांभीर्य जन माहिती अधिकारी जे की, निवासी नायब तहसिलदार म्हणून कार्यरत आहेत त्यांना दिसून येत नाही. संबंधित तलाठयांनी जेव्हा असे लेखी स्वरूपात अपिलार्थींना कळविले त्यावेळी आपण काय कार्यवाही केली अशी विचारणा सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांना केली असता जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी आपण काहीच कार्यवाही केली नाही असे विधान केले.

एकूणच ६ सर्व्हे नंबरचा अभिलेख गहाळ होण्याची बाब निवासी नायब तहसिलदार या पदावर कार्यरत असलेल्या अधिका-याने इतक्या सहजतेने घेणे ही बाब जितकी आश्चर्यकारक आहे तितकीच गंभीरदेखील आहे. आपण प्रशासकीयदृष्टया काही चौकशी केली का? या प्रश्नाचे उत्तरदेखील जन माहिती अधिकारी श्री. राजेश थोरे, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय रोहा यांनी नकारात्मक दिले.

एकूणच या प्रकरणातील तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. राजेश थोरे, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय रोहा यांची भूमिका ही प्रशासनाची अकार्यक्षमता दर्शविणारी आहे. सबब, तहसिलदार, तहसिल कार्यालय, रोहा यांनी पुढील सुनावणीसाठी सदर प्रकरणी त्यांनी केलेल्या व भविष्यात करण्यात येणा-या कार्यवाही संदर्भात शपथपत्रासह आयोगाकडे स्वत: उपस्थित राहणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

१. **तहसिलदार, तहसिल कार्यालय, रोहा यांनी पुढील सुनावणीसाठी सदर प्रकरणी त्यांनी केलेल्या व भविष्यात करण्यात येणा-या कार्यवाही संदर्भात शपथपत्रासह आयोगाकडे दि.२४.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहावे.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२४.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चंन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, रोहा, रोहा पोलीस स्टेश जवळ, चनेरा रोड, ता.रोहा, जि.रायगड ४०२ १०९.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ